रामनवमी - १०.४.२०२२

|| श्रीराम ||

त्रिभुवन मंडित माळ शोभतसे गळा।
ज्याच्या शोभतसे गळा।
आरती ओवाळू पाहू ब्रह्मपुतळा॥

राम श्रीराम जय राम जय जय राम॥
आरती ओवाळू पाहू सुंदर मेघश्याम।राम।
टणत्काराचे ठाण करी धनुष्यबाण।करी धनुष्य
मारुति पुढे उभे हात जोडून।
राम श्रीराम जय राम जय जय राम
आरती ओवाळू पाहू सुंदर मेघश्याम।

भरत शत्रुघ्न दोघे चवऱ्या ढाळिती
दोघे चवऱ्या ढाळिती
सिंहासनी आरुढले जानकीपती।
राम श्रीराम जयराम जय जय राम।
आरती ओवाळू पाहू सुंदर मेघश्याम॥राम

रत्नजडित माणिक वर्णू काय मुकुटी।
वर्णू काय मुकुटी।
स्वर्गातुनि देव पुष्पवृष्टि करती।
राम श्रीराम जयराम जय जय राम।
राम श्रीराम जयराम जय जय राम।
आरती ओवाळू पाहू सुंदर मेघश्याम।

विष्णुदास नामा म्हणे मागणे हेचि
आता मागणे हेचि।
अखंडित सेवा घडो रामचरणांची।
राम श्रीराम जयराम जय जय राम॥

© www.madhaveeraghuveer.com